# वेळापत्रक

संध्याकाळी सर्व घरकाम उरकून मी मागच्या दारी असलेल्या छोटया बाल्कनीत येऊन बसले. या देशात उन्हाळा वरदान वाटतो. चार महिने बर्फ असते. नंतर जाणवण्याइतपत थंडी असलेला वसंतऋतु येतो. तो संपून जेव्हा गात्रांतील थंडी घालवून टाकणारा उबदार उन्हाळा सुरू होतो तेव्हा चैतन्याची दिवाळी साजरी होतेय असे जाणवू लागते. 'आऊट-डोअर ॲक्टिव्हिटीज्' या सदरात मोडणारे सारे प्रकार येथील लोक उत्साहाने करू लागतात. सहलीला जातात, वनभोजने करतात, समुद्र किनाऱ्यावर तासन्तास घालवितात, निरनिराळे खेळ खेळतात. आमच्या घरामागच्या मोकळ्या जागेत देखील शेजार-पाजारची लहान मुले दिवसभर गोंधळ घालतात. क्षणात छोटया, छोटया सायकलीवर स्वार होऊन शर्यंत लावतात, दुसऱ्या क्षणी चेंडूच्या फेकाफेकीत धडपडतात नि तिसऱ्या क्षणी माझ्याकडे इलेक्ट्रिक ट्रेन आहे, तुझ्याकडे नाही म्हणून माझे वडील चांगले आहेत किंवा आपल्या दोघांच्या वडिलांमध्ये काही कॉमन नाही या बिनबुडाच्या मुद्यावर भांडतात व 'यू आर नॉट माय फ्रेंड' हे निर्वाणीचे वाक्य एकमेकांच्या तोंडावर फेकून आपापल्या घरी जातात. साधारण अर्ध्या तासाने पुन्हा येतात व 'विल यू बी माय फ्रेंड?' अशा प्रश्नाने तहाची बोलणी सुरू करतात. त्यांच्या या खेळण्याने, बोलण्याने खूपदा माझी करमणूक होते व काही वेळा त्यांचा गोंधळ--आवाज असह्यही होतो.

ह्या मुलांचे खेळ, रूसणे, भांडणे निरखताना, माझी नजर रोज शेजारच्या इमारतीच्या कोपऱ्यातील अपार्टमेंटच्या खिडकीकडे जाते. उन्हाळा सुरु झाल्यापासून जवळजवळ रोज संध्याकाळी ६।। ते ७ च्या सुमाराला त्या खिडकीच्या छोटया फटीतून एका लहान मुलाचे उत्सुक

डोळे, या मुलांचे खेळ बघताना दिसतात. तो वयाने २॥ ते ३ वर्षांचा असावा. त्यामुळेच त्याची आई त्याला या मुलांमध्ये येऊन खेळू देत नसावी. त्या मुलाच्या हालचाली निरखणे हा नकळत माझा छंद होऊन बसला. तो त्या खिडकीत बसून त्याचा खाऊ खाई, बाहेरच्या मुलांकडे बघून टाळ्या वाजवी, कधी ओरडे तर कधी जीभ दाखवी, कधी खेळण्यातील टेलिफोन-वर एकटाच बोलत बसे. एखाद्या संध्याकाळी त्याची आई त्याला रागा-वते आहे, मारते आहे, तो रडतो आहे हेही ऐकू येई व मला उगाचच चुटपुट लागून राही. भारतात असते आणि शेजारचा मुलगा असा खिडकीतून रोज संध्याकाळी एकटाच बाहेर केविलवाणेपणे बघत राहिलेला पाहिला असता तर एव्हाना मी त्याच्या कुटुंबाची ओळख करून घेतली असती व रोज त्या गोऱ्यापान गुबगुबीत मुलाला खेळवायला घेऊन आले असते. त्याच्या मऊशार तळव्यावर खाऊ दिला असता नि त्याचे अगणित पापे घेतले असते. पण येथे सारी उलटी तऱ्हा. लग्नानंतरच्या पहिल्या काही दिवसातच मला लहान मुलांची भलती आवड आहे हे लक्षात येऊन विज-यने बजावले, "हे बघ, सोनूबाई, ही बारामती नाही. कुणाच्या मुलाला घरात बोलवायचं नाही, खाऊ द्यायचा नाही, कुणाला आपल्या घरात आणलंस नि खेळताना दुखापत झाली तर त्या मुलाचे आईवडील मला कोर्टात खेचतील आणि ५–१० हजार डॉलर्सची नुकसान भरपाई द्यावी लागेल. मग तुझी लायब्ररी, पुस्तके सारं जागेवर राहील. माझ्या पुस्त-कांच्या संग्रहाबद्दल अशी धमकी देणे नेहमीप्रमाणे लगेच मला लागू पडले. आणि मुलांबरोबर जवळीक करण्याच्या माझ्या उर्मी मी नियंत्रणा-खाली आणल्या. पण येथील एकंदर सामाजिक संकेताच्या अतिरेकीपणाचा रागही आला. मुलांना घरी बोलवायचे नाही याचा अर्थ बाल्कनीत बसून त्यांना दुरूनच बघून आपली आवड पूर्ण करायची असा सोईस्कर अर्थ काढून मी त्या खिडकीतून बघणाऱ्या एकाकी मुलाकड बघू लागले व त्याची प्रत्येक संध्याकाळ माझ्या सहानुभूतीचा विषय बनली.

एक संध्याकाळ मात्र अशी आली की, त्या मुलाचा व माझा नकळत परिचय झाला. मी रस्त्यापलिकडच्या हॉस्पिटलच्या कोपऱ्यावर असलेल्या पत्रपेटीत, पत्र पोस्ट करून रस्ता ओलांडत असता, आईचा हात धरून

फिरायला निघालेला तो मला दिसला. येथे ओळख नसतानाही कुणालाही 'हॅलो' म्हणायचा अनौपचारिक संकेत आज माझ्या मदतीला धावून आला. मी तातडीने त्या बाईना हॅलो म्हणाले व आमची ओळख झाली. आम्ही एकमेकांचे शेजारी आहोत हे समजल्यावर त्या बाईनी स्वत:ची माहिती सांगितली. त्यांच्या हाताचे बोट घट्ट धरून कुतुहलाने रस्त्यावरची रहदारी पाहणाऱ्या तीन वर्षाच्या जिमला ११ वर्षांचा मोठा भाऊ होता व लवकरच जिमला भाऊ किंवा बहीण होणार होती. जिमची आई बँकेत नोकरीला असून सध्या रजेवर होती व रोजचा व्यायाम म्हणून फिरायला बाहेर पडली होती. या निमित्ताने तरी जिमला रोज खिडकीत बसून कंटाळवाणी संध्याकाळ न घालवता रोज फिरायला मिळेल या विचाराने मी आनंदी झाले. अधून-मधून जिमच्या आईची व माझी भेट होत असे.

काही महिने उलटले व पुन्हा जिम मला एकटाच त्या खिडकीत दिसू लागला, त्याचे नवे भावंड बहुधा आले असावे. एके दिवशी धीर करून मी जिमच्या घराचे दार ठोठावले. त्याच्या आईने दार उघडले व मला आत यायला सांगितले. साधारण १०–१५ मिनिटे गप्पा मारून जिमच्या गोबऱ्या गालाचा पापा घेऊन मी परतले. जिमला बहीण झाल्याने जिमची आई फार आनंदात होती. अमेरिकन स्त्रिया कोणत्या मातीच्या बनल्या आहेत न कळे. बेबीच्या जन्मानंतर तीन आठवडे संपण्यापूर्वीच ती पूर्ववत कामाला जाऊ लागली होती. बेबीची देखभाल व थोडेफार घरकाम करायला तिने 'हाऊसकीपर' ठेवली होती व त्यामुळे हाऊसकीपरच्या पगारासाठी तिचे नोकरी करणे पूर्वीपेक्षा अधिक आवश्यक वाटू लागले होते. संध्याकाळी घरी आल्यावर हाऊसकीपर निघून जाई. साहजिकच बेबीच्या आगमनामुळे संध्याकाळच्या घरातल्या कामाचे वेळापत्रक बदलले. संध्याकाळचे जेवण झाल्यावरचा ७ ते ८।। हा वेळ बेबीसमवेत बेबीच्या खोलीत घालवायचा, असे ठरवावे लागले. जिमचे वडील घरापासून ७० मैल दूर काम करीत असल्याने संध्याकाळच्या 'रश अवर' मध्ये ड्राइव्ह करून घरी पोचायला त्यांना नेहमीच उशीर होई.

जिमचा ११ वर्षांचा भाऊ मित्रांसमवेत खेळण्यात संध्याकाळ घालवतो, जिमची आई नव्या बेबीवर अन्याय होऊ नये म्हणून संध्याकाळ

तिच्या खोलीत घालवते. जिमी तीन, सव्वातीन वर्षांचा म्हणून बाहेर खेळायला जाऊ शकत नाही, आईच्या वेळापत्रकात बसत नाही म्हणून दिवसभर तिची वाट पाहूनही बेबीच्या खोलीत तिच्याबरोबर संध्याकाळ घालवू शकत नाही. जिमीच्या वाट्याला आलेली असते ती खिडकी नि रोजची अबोल संध्याकाळ. थंडी सुरू झाली नाही म्हणून खिडकीची लहानशी फट तरी उघडी असते. त्या उघडया फटीतून जिमीचे डोळे बाहेरच्या मुलांचे खेळ बघू शकतात. काही दिवसातच थंडी पडू लागेल. खिडकीची ती फटही बंद होईल. हिवाळ्याचे स्वागत नि बर्फाचा मारा सहन करणारी ती 'स्टॉर्म विंडो' बनेल. चिमुकल्या जिमीच्या इवल्या मनातील 'एकाकी-'पणाचे वादळ मात्र त्याच्या नकळत वाढत्या वयानुसार रौद्र स्वरूप धारण करेल. दुर्लक्षिला गेलेला जिमी कदाचित मोठा होऊन चांगल्या मित्रांच्या संगतीसोबतीने स्वतःचे आयुष्य समाधानाने घालविल किंवा वाईट संगतीने त्या वादळात भरकटला जाईल व एखाद्या बालगुन्हेगार-सुधार केन्द्रातील एकाकी खिडकीजवळ आपल्या उमलणाऱ्या आयुष्याच्या एकाकी संध्या व्यतीत करील.

मला वाटतंय जिमीच्या आईशी पुन्हा एकदा बोलून सांगावं, 'जिमीच्या आई, आहे ते वेळापत्रक बदला. कोण जाणे, जिमीच्या आईला आवडेल का ? येथे कुणी कुणाच्या वैयक्तिक बाबींबद्दल मतं व्यक्त करायची नाहीत, हाही एक अतिरेकी संकेत आहे.

आजही जिमीच्या घराची ती खिडकी मला विचार करायला लावते. वेळापत्रक न आंखता आम्हा सहा भावंडांचे जीवन आखीव-रेखीव बनविणारी, सतत अठरा वर्षे एका प्राथमिक शाळेची शिस्तप्रिय मुख्याध्यापिका म्हणून वावरलेली, हजारो मुलांमुलीच्या आयुष्याला आकार देणारी माझ्यापासून हजारो मैल दूर, तरी मनाच्या अगदी जवळ असणारी माझी 'आई' आठवते नि मन म्हणते, 'जिमी तुझ्या आईचे वेळापत्रक तुझ्या जीवनाचे वेळापत्रक चुकविणार आहे रे .....!'

♣

– डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर

(‘अमेरिका किती मोठी ? किती छोटी ?’ या कथासंग्रहातून)